# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २९ /०९/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अ.क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. १८/ ०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. १८/ ०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | प्रभाग समिती "एफ" धानिव/पेल्हार येथे वॉर्ड क्र३ ४२ गणेश नगर येथे रस्ता खडीकरण करणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदरच्या कामी येणाऱ्या रू. १४,४२,५०७/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | प्रभाग समिती 'डी' आचोळे क्षेत्रातील वॉर्ड क्र.६३ मधील आचोळे मुख्य रस्ता ते हॅरिस कलेक्शन पर्यंत पेव्हर ब्लॉकचा रस्ता बनविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्च नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूर देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | प्रभाग समिती- एफ,धानिव/पेल्हार क्षेत्रातील | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेंस व |

<table>
<tr>
<td></td>
<td>महानगरपालिकेच्या जागेमध्ये नालासोपारा फाटा येथे अग्निशमन केंद्राची इमारत बांधणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.</td>
<td>सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६६८५६२९/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर<br>ठराव सर्वानुमते मंजूर.</td>
</tr>
<tr>
<td>५.</td>
<td>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने समुपदेष्टा वर्ग नियुक्त करणेबाबत.</td>
<td>ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने समुपदेष्टा वर्ग नियुक्त करणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त केलेल्या समुपदेष्टा यांच्या सेवा कालावधी दि.०७/०६/२०१७ रोजी संपुष्टात आल्याने उपरोक्त सेवा देण्यास अडचण येत आहे. महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधानुसार समपदेष्टा संवर्गाची एकूण ४ पदे मंजूर असून महानगरपालिकेच्या ४ मंजूर पदांव्यतीरिक्त २ वाढीव पदाची आवश्यकता लक्षात घेता एकूण ६ समुपदेष्टा पदे नियुक्ती करणे आवश्यक आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधानुसार शासन निर्णय क्र.वविम-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३, दि.०९ सप्टेंबर २०१४ नुसार खालील तक्त्यात नमुद मंजूर पदे आहेत.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पद</th><th>मनपा आकृतीबंधानुसार मंजूर पदे</th><th>महानगरपालिका कार्यरत पदे (कंत्राटी)</th><th>रिक्त पदे</th><th>जादा पदे</th></tr>
<tr><td>१</td><td>समुपदेष्टा</td><td>०४</td><td>००</td><td>०४</td><td>००</td></tr>
<tr><td>२</td><td>समाज सेवक</td><td>०७</td><td>००</td><td>०७</td><td>००</td></tr>
</table>
यानुसार महानगरपालिकेची २ रुग्णालये, १ माता बाल संगोपन केंद्र तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ९ दवाखाने कार्यरत असून सदरचे महानगरपालिकेचे १ रुग्णालय, १२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व माता बाल संगोपन केंद्र सातिवली हे २०१४ नंतर कार्यान्वीत झालेले आहेत. त्यामुळे सदर रुणालयात रुग्णांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता महानगरपालिकेच्या मंजुर</td>
</tr>
</table>

| अ.क्र | पद | मनपा रुग्णलाये/ माता बाल संगोपन केंद्र | आवश्यक पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | समुपदेष्टा | विजय-नगर तुळींज रुग्णालय, ना.सो. | ०३ |
| | | सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई | ०२ |
| | | माता बाल संगोपन केंद्र ,सातिवली | ०१ |
| | | एकूण | ०६ |

आकृतीबंधानुसार जास्त पदांची आवश्यकता लक्षात घेता अतिरिक्त समुपदेष्टा ही पदे खालील प्रमाणे नियुक्ती करणे आवश्यक आहेत.

यानुसार मंजुर आकृतीबंधानुसार समुपदेष्टा ४ पदे मंजूर असून जास्तीची २ पदांची आवश्यकता लक्षात घेता मंजुर आकृतीबंधामध्ये समाज सेवक ही ७ पदे मंजूर असून या पदाकरीता शैक्षणिक अर्हता व वेतन श्रेणी ही दोन्ही पदांची सारखीच आहे. त्यामुळे समुपदेष्टा व समाज सेवक मिळून ११ पदे होत असून फक्त त्यातील ६ पदेच भरावयाची असल्याने सदर पदे ही आकृतीबंधाचे मर्यादेतच आहेत.

सबब वैद्यकीय आरोग्य विभागातील समुपदेष्टा (Counsellor) ०४ पदे व २ समाज सेवक अशी ६ पदांची आवश्यकता तसेच विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता कलम ५३(३) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने सदर नेमणूका ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस हरकत नसून ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- मा.श्री.सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

| | | |
|---|---|---|
| **६.** | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र व आयसोलेशन वॉर्ड यासाठी आवश्यक वाढीव पदे | **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभगामार्फत नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र व आयसोलेशन बार्ड यासाठी आवश्यक वाढीव पदे (जी.एन.एम. व ए.एन.एम.) कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | (जी.एन.एम. व ए.एन.एम.) कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत. | अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त केलेला असून महानगरपालिकेचे सर्वोदय वसाहत येथे माता बाल संगोपन केंद्र लवकरच सुरु करण्यात येणार असल्या कारणाने कर्मचारी वर्ग अपूरा पडणार असल्यामुळे व महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वाईन फ्लु ची लागण झाल्यामुळे स्वाईन फ्लु बाधीत रुग्णांकरीता बोळींज येथे आयसोलेशन वार्ड सुरु करण्यांत येणार असून आयसोलेशन वार्ड साठी कर्मचारी वर्गाची आवश्यकता लक्षात घेता साथ सदृश परिस्थिती असल्याने उपरोक्त कामासाठी वाढीव ५ जी.एन.एम. व ८ ए.एन.एम. ही पदे वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२४/०४/२०१७ ते दि.२६/०४/२०१७ रोजी थेट मुलाखती घेण्यात आलेल्या असून या मुलाखतीच्या प्रक्रियेमधील प्रतिक्षा यादीमधुन सवंर्ग निहाय भरणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र व आयसोलेशन वॉर्ड यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी वर्ग कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभगामार्फत नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र व आयसोलेशन वार्ड यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी वर्ग कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त केलेला असून महानगरपालिकेचे सर्वोदय वसाहत येथे माता बाल संगोपन केंद्र लवकरच सुरु करण्यात येणार असल्या कारणाने वैद्यकीय अधिकारी वर्ग अपूरा पडणार असल्यामुळे व महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वाईन फ्लु ची लागण झाल्यामुळे स्वाईन फ्लु बाधीत रुग्णांकरीता बोळींज येथे आयसोलेशन वार्ड सुरु करण्यांत येणार असून आयसोलेशन वार्ड साठी वैद्यकीय अधिकारी वर्गाची आवश्यकता लक्षात घेता साथ सदृश परिस्थती असल्याने उपरोक्त कामासाठी रिक्त वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस. या पदांवर ०४ वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. ही पदे वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२४/०४/२०१७ ते दि.२६/०४/२०१७ रोजी थेट मुलाखती घेण्यात आलेल्या असून या मुलाखतीच्या प्रक्रियेमधील प्रतिक्षा यादीमधुन सवंर्ग निहाय भरणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ८. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकणासाठी विविध रसायणे (क्लोरिन गॅस टनर व पी.ए.सी) पुरवठा करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दरांची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असता मे. जी.एस.कमर्शिअल कार्पोरेशन यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. महेश पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | श्री. शैलेश भालचंद्र वर्तक, तारतंत्री ,बोळींज विभाग वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती करुन मिळणेबाबत. | **ठराव** :- जिल्हा शल्य चिकीत्सक, पालघर यांचेकडील दिनांक १७/०५/२०१७ रोजीचे आदेश पाहण्यांत आले. श्री. शैलेश भालचंद्र वर्तक यांस सदरहू आदेशाप्रमाणे त्यांचे वडील श्री. भालचंद्र कमळाकर वर्तक यांचेवर शस्त्रक्रिया व औषधोपचारा करीता झालेल्या खर्चापैकी रक्कम रु. ६१,१७५/- (अक्षरी एकसष्ट हजार एकशे पंचाहत्तर मात्र) अदा करणेस आजची हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि.०४/०९/२०१७ ते दि.१०/०९/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त मा.स्थायी समितीचे माहितीसाठी. | **ठराव :-** सदरबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती व सभागृहातील चर्चा मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली व त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेस सभेन एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.५२ मधील सर्वोदय वसाहत येथे माता बाल संगोपन केंद्र बांधणे या कामी प्राप्त | **ठराव** :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १७४ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामी कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या मे.राज एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.७५% जादा दराने निविदा लघुत्तम आहे. |

| | | |
|---|---|---|
| | निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कामी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील   सूचक :- मा.श्री. किशोर ना. पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **१२.** | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागास सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये जंतूनाशके व किटकनाशके खरेदी केलेल्या निविदेच्या प्रक्रियेबाबतची वस्तुस्थितीदर्शक विस्तृत अहवाल. | **ठराव** :- प्रस्तुत प्रकरणी मुख्य लेखापरिक्षक यांनी तयार केलेला अहवाल मा.स्थायी समितीच्या सदस्यांना आगाऊ स्वरुपात उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे. त्यावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेच्या अनुषंगाने आजची स्थायी समिती खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे. १) जंतूनाशके व किटकनाशके खरेदीच्या निविदेप्रकियेबाबत सदरचा अहवाल प्र.सहा. आयुक्त (स्वच्छता) यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.  २) जंतूनाशके/किटकनाशके खरेदीकामी सन २०१३/१४ पासून आजमितीस आर्थिक वर्षापर्यंत वर्षनिहाय केलेल्या खर्चाची आकडेवारी त्यासंदर्भातील दस्ताऐवज, परिशिष्टासह संबंधितांचे स्पष्टीकरण व आवश्यक खुलाश्यासह प्रशासनाने पुढील स्थायी समिती समोर सादर करावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुदेश चौधरी   सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **१३** | वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती जी प्रभाग समिती एच नवघर प्रभाग समिती आय वसई हद्दीतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यां करीता आंतरशालेय कला-क्रिडा महोत्सव २०१७ चे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरील विषयाबाबत मा.स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली असून शालेय कला-क्रीडा महोत्सवाच्या व्यापक प्रसिध्दीसाठी फ्लॅक्स बॅनर छपाई, निमंत्रण पत्रिका छपाई, स्पर्धकांना बक्षिस खरेदी, चॉकलेट, बिस्कीट, तसेच कार्यक्रमासाठी लागणारी स्टेशनरी, कार्यक्रमासाठी येणारे पंचाचे मानधन, भोजन व्यवस्था, चहा, नाश्ता, बिसलरी पाणी तसेच मैदानावर मंडप, स्टेज,साऊंड सिस्टीम, खुर्च्या, सोफे,फॅन, जनरेटर, हॅलोजन भाड्याने घेणे तसेच मैदानावर कोणतीही अनपेक्षित घटना घडू नये त्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेचे आहे. तसेच जिल्हा स्तरीय महापौर शरीर सौष्ठव सहा वजनी निहाय गटाचे आयोजन करणे व इतर अनुषंगिक खर्च होणार आहे. तसेच सदरच्या कला क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे अर्ज भरावयाचे आहे. त्याकामी दरपत्रक मागविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. तसेच कला-क्रीडा महोत्सवासाठी लागणारे साहित्य सन २०१७-१८ च्या वार्षिक मंजूर निविदाधारकांकडून मिळावे आणि ज्या साहित्याची निविदा मंजूर झालेली नाही ते साहित्य दरपत्रक/निविदा मागवून करणेंस मंजूरी देत आहे. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी एकूण रक्कम रू. ३०,००,०००/- (अक्षरी रू. तीस लक्ष मात्र) प्रस्तावातील प्रस्तावनेनुसार ही सभा मंजूरी देत आहे. प्रभाग समिती (जी) वालिव विभागातील शाळेतील विद्यार्थी व प्रभाग समिती (आय) विभागातील काही शाळेतील विद्यार्थी हे सद्यस्थितीत प्रभाग समिती (एच) नवघर माणिकपूर विभागातील शालेय कला-क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात. त्याकरीता प्रभाग समिती (जी) वालिव विभागासाठी लेखा शिर्षक क्रीडा विषयक राखीव |

| | | |
|---|---|---|
| | | तरतुदी अंतर्गत आंतरशालेय कला-क्रीडा महोत्सवासाठी केलेली तरतुद रक्कम रु. २१ लक्ष २० हजारं ही प्रभाग समिती (एच) विभागासाठी वर्ग करणेस मंजूरी मिळालेली आहे. सदरचा कला-क्रीडा महोत्सवासाठी होणारा अपेक्षित खर्च रक्कम रु. ३० लक्ष ह्या दोन्ही तरतुदीतुन करणेंस ही सभा मंजूरी देत आहे. त्यानुसार सदरचे कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणे कामी येणाऱ्या सर्व खर्चास व त्यांची बिले अदा करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक : वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई- विरार शहर महानगरपालिका